दिनांक 18/07/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 70

विषय – विटा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 करीता गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे तसेच तद्अनुषंगीक कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी संगणक अभियंता यांची दिनांक 15/07/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) नगरविकास विभाग एमसीओ/2025/प्रक्र242/नवि14 दिनांक 12/06/2025 रोजीचे पत्र

संदर्भ क्रं.2 विटा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 करीता गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करावयाचे आहेत. त्यानुसार प्रगणक गट दर्शवणारा नकाशा संगणकातील गुगल अर्थ नकाशावर प्रगणक सीमा, लोकसंख्या, कोड नंबर इत्यादी मांडणी केलेले प्रारुप व अंतिमप्रगणक गटांचा व प्रभागाचा कलर नकाशे तयार करावयास लागणार आहेत. याकरीता अल्प मुदतीची निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तरी विटा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 करीता गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे तसेच तद्अनुषंगीक कामे करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 18/07/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 71

विषय – विटा नगरपरिषदेच्या आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथील वृक्षतोड करून लिलाव करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 15/07/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेच्या आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथील विकास कामे करणेकामी परिसरातील वृक्षतोड करून लिलाव करणे आवश्यक आहे. सदर झाडांचे परिमंडळ वन अधिकारी, खानापूर - विटा यांचेकडून मुल्यांकन करणेत आले आहे. सदर झाडे तोडणेकामी वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, खानापूर-विटा (प्रा.) यांचेकडून परवानगी घेणेत आली आहे.

तरी विटा नगरपरिषदेच्या आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथील वृक्षतोड करून लिलाव करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा